त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा।
नेती नेती शब्द न ये अनुमाना।
सुरवर मुनिजन योगी समाधी न ये ध्याना।।
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता।
आरती ओवाळितां हरली भवचिंता ॥ जय देव जय देव ॥

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त।
अभाग्यासी कैंची कळेल ही मात।
पराही परतली तेथें कैंचा हेत।
जन्ममरणाचाही पुरलासे अंत।।
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता।
आरती ओवाळितां हरली भवचिंता ॥ जय देव जय देव ॥

दत्त येऊनियां उभा ठाकला।
भावें साष्टांगेंसी प्रणिपात केला।
प्रसन्न होऊनि आशीर्वाद दिधला।
जन्ममरणाचा फेरा चुकविला॥
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता।
आरती ओवाळितां हरली भवचिंता ॥ जय देव जय देव ॥

दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान।
हरपलें मन झालें उन्मन।
मी-तू-पणाची झाली बोळवण।
एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान॥
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता।
आरती ओवाळितां हरली भवचिंता ॥ जय देव जय देव ॥

www.MandirTheTemple.com
YouTube: @MandirTheTemple
Instagram: @MandirTheTemple
Facebook: /MandirTheTemple
अर्थ व विधि
QR स्कैन करें